**वाचले :-**

१. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४
२. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
३. सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसुचना क्र/करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२० नुसार महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम २०२०.

---

जिल्हा दंडाधिकारी पालघर * जिल्हा पालघर *

क्र/गृह/का.१/टे.३/मनाई आदेश/एस.आर.१५/२०
जिल्हादंडाधिकारी कार्यालय पालघर
दि.२२/०३/२०२०

**आ दे श**

ज्याअर्थी आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत करोना (कोव्हिड १९) या विषाणूचा संसर्ग बाधीत रुग्ण आढळून आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरुन व देशातंर्गत विमान प्रवासाव्दारे प्रवासी भारतात सर्वत्र प्रवास करीत आहेत. असे प्रवासी पालघर जिल्हयामध्ये ही परदेश प्रवास करुन आलेले आहेत. त्यामुळे करोना विषाणुचा (कोव्हिड १९) संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व करोना विषाणुचे (कोव्हिड १९) संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होऊ न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. यास्तव गर्दीच्या ठिकाणी जाणे, वास्तव्य करणे इत्यादी बाबींमुळे करोना विषाणुचा संसर्ग जिल्हयात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

आणि ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.३ मधील शासन अधिसूचनेनुसार तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० अन्वये जिल्हाधिकारी पालघर यांना पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

आणि त्याअर्थी करोना विषाणुच्या (कोव्हिड १९) प्रसारामुळे मानवी जीवन, आरोग्य व सुरक्षितता धोक्यात आली आहे. तसेच सदर विषाणुची लागण एका संक्रमित रुग्णाकडून अन्य व्यक्तीस / इसमास त्याच्या संपर्कात आल्याने होण्याची शक्यता विचारात घेता, मी **डॉ. कैलास बा. शिंदे, जिल्हादंडाधिकारी पालघर** मला फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रामधील वसई विरार शहर महानगरपालिका, नगरपरीषद पालघर, डहाणू, जव्हार, नगरपंचायत मोखाडा, वाडा, विक्रमगड, तलासरी तसेच ग्रामीण भागातील बोईसर व तारापूर ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रामध्ये दि.२३/०३/२०२० रोजी पहाटे ५.०१ ते दि.३१/०३/२०२० रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत त्यांचे राहते घर/राहण्याचे ठिकाण सोडून कोणत्याही सार्वजनिक/खाजगी ठिकाणी, परीसरातील रस्ते, हमरस्ते, सार्वजनिक मार्ग या ठिकाणी प्रवेश करणे, फिरणे,

उभे राहणे, ताटकळणे, भटकणे, वाहन चालविणे या व यासारख्या कृतींना मज्जाव करण्याकरीता मनाई आदेश लागू करीत आहे.

तथापी जिल्हयातील अत्यावश्यक व जीवनावश्यक सेवा पुरविणाऱ्या खालील आस्थापनांना यातून वगळण्यात आले आहे.

१) दुध, अन्न पुरवठा सेवा, अन्नधान्य, किराणा, चिकन, मटण, अंडी, मासे.

२) फळे व भाजीपाला.

३) पशु व पोल्ट्री खादय व त्याची वाहतूक.

४) हॉस्पिटल्स, मेडीसीन व फार्मास्युटीकल्स संबंधित सेवा, वैद्यकीय साहित्य (Medical Equipment)

५) बँकींग व वित्तीय सेवा, विमान सेवा संबंधित सेवा.

६) दुरध्वनी व संचार सेवा.

७) बंदर संबंधित सेवा.

८) प्रसार माध्यमे संबंधित.

९) विज, पेट्रोलियम, ऑईल आणि एनर्जी संबंधित.

१०) पिण्याचे पाणी व पाणी पुरवठा

११) वरील सर्व बाबींशी संबंधित वेअर हाऊसिंग, वरील सर्व बाबींशी संबंधित पुरवठा साखळी. (Supply Chain)

१२) वरील सर्व सेवांशी संबंधित IT Services (मर्यादित मनुष्यबळावर)

१३) अत्यावश्यक वस्तू/माल व त्या संबंधित मनुष्यबळाची वाहतूक करणारी वाहने (आवश्यक फलक लावून)

सदरहू आदेश अत्यावश्यक सेवा देणाऱ्या संस्था/ व्यक्ती यांना / त्यांचे वाहनांना लागू असणार नाही.

सदरच्या मनाई आदेशाचा भंग केल्यास संबंधितांविरुध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ नुसार कारवाई करण्यात येईल.

सदरचा आदेश आज दि.२२/०३/२०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

सही/-xxx
(डॉ.कैलास बा. शिंदे)
**जिल्हादंडाधिकारी पालघर**

**प्रत:-**

१) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

२) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका, विरार यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी व प्रसिध्दीकरीता.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी व प्रसिध्दीकरीता.

४) पोलीस अधीक्षक पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी व प्रसिध्दीकरीता.

५) उपविभागीय दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/जव्हार/वाडा यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

६) तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/तलासरी/मोखाडा/जव्हार/विक्रमगड/वाडा यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

७) जिल्हा शल्य चिकित्सक पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

८) मुख्याधिकारी, नगरपरीषद जव्हार/डहाणू/पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

९) मुख्याधिकारी, नगरपंचायत वाडा/विक्रमगड/मोखाडा/जव्हार यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१०) गट विकास अधिकारी, पंचायत समिती पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

११) ग्रामपंचायत बोईसर, तारापूर, यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

१२) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांना माहिती तथा पुढील कार्यवाहीसाठी.

१३) जिल्हा माहिती अधिकारी पालघर यांना माहिती तथा प्रसिध्दीकरीता.

जिल्हादंडाधिकारी पालघर